प्रेसनोट

दिनांक ०७/०२/२०१८

# अमेरीकन आय.आर.एस. अधिकारी व बँक वित्तीय अधिकारी अशी बतावणी करुन अमेरिकन नागरीकांना फसवणाऱ्या कॉलसेंटरवर पुणे सायबर सेलच्या पथकाने छापा टाकुन तिघांना केली अटक

सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर यांना गोपनिय सुत्राकडुन माहिती मिळाली की, पिनॅकल बिल्डींग, दुसरा मजला, लेन नं. ६, नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क, पुणे येथे नाइट कॉल सेंटर रात्री ९.०० ते सकाळी ७.०० वा. पर्यन्त सुरु असुन, सदरच्या कॉल सेंटरव्दारे अमेरीकेतील नागरीकांना फसविले जात आहे. त्यानुसार मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे , श्री. प्रदिप देशपांडे, मा. पोलीस उप-आयुक्त सो. आर्थिक व सायबर श्री. सुधीर हिरेमठ, मा. स.पो.आ. आर्थिक व सायबर श्री. निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.०५/०२/२०१८ रोजी सायबर क्राईम सेलच्या पथकाने कोरेगाव पार्क सारख्या उच्चभ्रु भागातील पिनॅकल बिल्डींग, मध्ये ऑफीस नं. २०३, , दुसरा मजला, लेन नं. ६, नॉर्थ मेन रोड पुणे छापा टाकला असता सदर ठिकाणी ३ पुरुष कॉलसेंटर चालविताने मिळुन आले.

छापा घातल्यानंतर दिसुन आले की, अमेरीकन नागरीकांचे नाव, संपर्क क्रमाक, पत्ता व ईमेलआयडी इत्यादीची माहिती आरोपींना ऑनलाईन प्राप्त होत आहे. सदरच्या माहितीच्या आधारे आरोपी त्या नागरीकांना बल्क व्हाईस मेल पाठवित असत. त्यानंतर अमेरीकन नागरीकांनी परत कॉल केल्यास आरोपी अमेरीकन नागरीकांना कॉलवर ते आय.आर.एस. ऑफीसर असल्याचे सांगुन त्यांचा टॅक्स भरणे बाकी आहे असे सांगतात व टॅक्स दिला नाही तर ६ वर्ष शिक्षा व मालमत्ता जप्त केली जाईल अशी धमकी देतात. त्यामुळे समोरील नागरीक घाबरुन तडजोडीबाबत विचारतात. तेव्हा त्यांना जवळच्या शॉप मधुन वेगवेगळ्या किंमतीचे आयट्युन, टारगेट, वॉलमार्ट, बेस्टबाय गिफ्ट व्हावचर खरेदी करण्यास सांगुन तो व्हाऊचर नंबर त्यांच्याकडुन घेतला जातो व सदरचे नंबर पुढे गुजरातला पाठविला जातो व त्यानंतर त्याचे भारतीय चलनात रुपांतर करत असत.

डिसेंबर -२०१७ पुर्वी **PAYDAY Bank Loan** करुन देण्यासाठी बॅंकेचे वित्तीय अधिकारी बोलत आहे अशी बतावणी करुन अमेरीकन नागरीकांना बॅंक प्रोसेसींग फी म्हणुन ५०० ते १००० डॉलरचे गिफ्ट व्हाऊचर खरेदी करण्यास सांगुन त्यांची फसवणुक केली जात होती व त्यांना कुठल्याही प्रकारचे लोन दिल्या जात नव्हते. आरोपींनी आत्ता पर्यन्त फसवणुक केलेल्या अमेरीकन नागरीकांची संख्या अंदाजे ११,१२५ एवढी आहे. सदर कॉल सेंटरमध्ये काम करणारे इसम नामे १) शिवक प्रितमदा लधानी वय-२९ वर्ष रा धानोरी, पुणे २) प्रतिक सुभाषचंद्र पांचाल वय- ३० वर्ष रा. फ्लॅट नं. एफ/७, फेज-१, लिबर्टी, लेन नं. ६ समोर, कोरेगाव पार्क, पुणे ३) शेरल शतिषभाई ठाकर वय-३३ वर्ष रा. सदर यांच्या बिरुध्द कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन गु.र.नं. १० /२०१८ , भा.द.वि. कलम ४२०,५११, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी), ६६ (डी), ७५ प्रमाणे फिर्याद दिली आहे. सदरच्या गुन्ह्यात वरील आरोपींना अटक करुन त्यांच्याकडुन १ लॅपटॉप, ८ संगणक हार्डडीस्क, ३ मोबाईल, ८ हेडफोन व इतर महत्वाचे कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. त्यांची दि.०९/०२/२०१८ रोजी पर्यन्त पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. आरोपीचे परराज्यामध्ये असेच बनावट कॉलसेंटर सुरु असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यानुसार एक पथक सदर ठिकाणी इतर आरोपींचा शोध घेणेकामी रवाना करण्यात आले आहे. आरोपींना अमेरीकन नागरीकांचा डाटा कोठुन मिळत होता याबाबत अमेरीकन एफ.टी.सी. अधिकारी यांच्या मार्फत व मिळालेल्या डाटाच्या आधारे पिडीत अमेरीकन नागरीकांशी त्यांच्या मेलव्दारे संपर्क करुन त्याच्यांकडुन माहिती प्राप्त करीत आहोत. तसेच आरोपींच्या इतर चार साथिदारांचा शोध घेणेकामी एक पथक रवाना करण्यात आले आहे.

सदर कारवाई सायबर क्राईम सेलकडील पोलीस निरीक्षक गजानन पवार, स.पो.नि. सागर पानमंद व कर्मचारी अस्लम आत्तार, अजित कुऱ्हे, प्रसाद पोतदार, संतोष जाधव, नितेश शेलार यांचे पथकाने केली.